(Annexure - III)

**गोपनीय** **दिनांक: ३ फेब्रुवारी, २०१०**

प्रति,
मा.सचिव पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य,
मुंबई

विषय: **नागपूर येथील पशुविज्ञान विद्यापीठाच्या चौकशीबाबत**

महोदय,

आपले दिनांक ९ ऑक्टोबर, २००९ चे पत्र आणि उप सचिव (पशुसंवर्धन) यांचे १ डिसेंबर, २००९ च्या पत्रानुसार मला देण्यात आलेल्या तक्रारी अर्जासदर्भात नागपूर येथे पशुविज्ञान विद्यापीठात समक्ष जावून कागदपत्रांची पडताळणी करुन वस्तुनिष्ठ अहवाल आपल्याकडून पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे आपल्या सूचनेप्रमाणे निवडक तक्रारदार आणि विद्यापीठाचे कुलगुरु आणि कुलसचिव यांना समक्ष बोलावून त्यांच्याशी चर्चा करुन अहवालास अंतिम स्वरुप दिलेले आहे.

माझ्याकडे देण्यात आलेल्या तक्रार अर्जामध्ये जवळ जवळ सर्वच अर्जामधील मजकूर समान आहेत आणि तेच ते मुद्दे वेगवेगळया अर्जामधून नमूद करण्यात आलेले आहे. तक्रार क्रमांक २ मध्ये सुरुवातीला त्याचे सविस्तर विवेचन केलेले आहे व पुनरुक्ती होवू नये म्हणून त्याचा संदर्भ अहवालात नमूद केलेला आहे.

तरी कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू,

(वि. शं. धोंगडे )

## प्रास्ताविक

सचिव (पदुंम.) यांचे ९ ऑक्टोबर, २००९ च्या पत्राप्रमाणे मा.राज्यपाल यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी नागपूर येथील पशुविज्ञान विद्यापीठातील आलेल्या तक्रारीच्या संदर्भात दिलेला अहवाल तसेच पदभरतीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत सविस्तर चौकशी करुन अहवाल देण्याबाबत मला कळविलेले आहे. त्यानंतर १ डिसेंबर, २००९ च्या पत्राप्रमाणे एकुण ३२ तक्रारीबाबत असलेले कागदपत्र मला उपलब्ध करुन देण्यात आले. त्या पत्रासोबत प्रकरण क्रमांक नमूद केलेला आहे व तो संदर्भ देतांना नमूद केलेला आहे.

२. **प्रकरण क्रमांक १) एम. एन. येलगटे रा नांदेड यांची तक्रार** - जाहिरात क्रमांक १७७७/२००७ दिनांक ४ मे २००७ अन्वये वरिष्ठ लिपिक या पदाच्या सरळ सेवा भरतीसाठी विद्यापीठांनी जाहीरात दिली. या जाहिरातीची प्रत परिशिष्ठ म्हणून सोबत जोडली आहे. या जाहीरातीमध्ये टंकलेखनाबाबत कुठेच उल्लेख केलेल नव्हता. केवळ चाचणी घेवून एका पदास ५ उमेदवार गुणवत्तेनुसार निवड करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यत आली. पदाच्या प्रमाणात उपलब्ध उमेदवार आरक्षणासह विचार करुन गुणवत्तेनुसार तोंडी मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले. त्याप्रमाणे तक्रारदार उमेदवारास देखील तोंडी मुलाखतीसाठी बोलाविण्यात आलेले होते. सदर मुलाखातीपूर्वी विद्यापीठाने हजेरीपत्र भरुन घेवून प्रत्येक विद्यार्थ्याला टोकन नंबर दिले होते व त्याचे हजेरीबाबत त्याला तपासणी समितीने पत्र देखील दिलेले होते. त्याप्रमाणे सदर तक्रारदार यास टोकन क्रमांक ६ देण्यात आलेला होता. त्याच दिवशी तोंडी मुलाखतीचे कामकाज संपलेले आहे. ज्या दिवशी मुलाखत झाली त्या मुलाखतीचे मुळ कागदपत्र तपासण्यात आले. त्यावरुन असे दिसून आले की, सदर उमेदवाराची तोंडी मुलाखात घेण्यात आलेली नाही. किंवा तो गैरहजर आहे असेही नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी केलेल्या अर्जामध्ये तथ्य दिसून येते. विद्यापीठातर्फे असे समर्थन समक्ष चौकशीत सांगण्यत आले की, नाव पुकारल्यानंतर सदर उमेदवार तोंडी मुलाखतीसाठी हजर झाला नसावा. परंतु, मुळ कागदपत्रात कोरे रकाने त्यांचे म्हणण्यास पुष्टी देत नाहीत असा निश्कर्ष माझा आहे.

<u>**प्रकरण क्रमांक २) राणा दिलीपकुमार सानंद**</u> यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे पत्र देवून विद्यापीठातील भ्रष्टाचार व अनियमितता याबाबत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीतला पहिला मुद्दा असा

आहे की, खालील १२ प्राध्यापकांना ते लायक असतांना मुलाखतीमध्ये कमी मार्क देवून निवड करण्यात आलेली नाही. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:

१) डॉ.व्ही. डी. अहेर.
२) डॉ. पातुरकर
३) डॉ. कारेमोरे
४) डॉ. लाडूकर
५) डॉ. आमले.
६) डॉ. एस. व्ही. देशमुख
७) डॉ. सरकते.
८) डॉ. धांडे
९) डॉ. पंचभाई
१०) डॉ. व्ही. डी. मेश्राम.
११) डॉ. वाय. डी. देशमुख
१२) डॉ. वंजारी

यांचेऐवजी व्हेटर्नरी कौन्सिल यांचे निकष पूर्ण न करणा-या खालील १२ प्राध्यापकांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांची नावे खालील प्रमाणे :-

१) डॉ. पी.टी. जाधव
२) डॉ. बनालीकर
३) डॉ. चरंजर
४) डॉ. बानू बाकोडे
५) डॉ. अजय गावंडे
६) डॉ. काळबांडे
७) डॉ. भोसले
८) डॉ. शिरभाते.
९) डॉ. टाकरखेडे
१०) डॉ. चांगडे
११) डॉ. कल्याणकर
१२) डॉ. कोकणे

या १२ उमेदवारांच्या बाबतीत व निवड न झालेल्या उर्वरित १२ उमेदवारांच्या बाबतीत प्रत्यक्ष मुलाखतीच्या दरम्यान निवड मंडळाने तयार केलेले गुणवत्तापत्र तपासले आहे. या १२ उमेदवारांच्या मुलाखतीपैकी २ विषय दुग्ध विषयक विषयाच्या आहेत. उर्वरित ६ विषय पशुविज्ञान विभागाशी संबंधित आहेत. त्यासाठी अर्हताविषयक निकष व्हेटर्नरी कॉन्सिल ठरवून देते व त्याप्रमाणे ही पदे भरावयाची असतात. याबाबत विद्यापीठाने ॲकॅडमीक कौन्सिलमध्ये या भरावयाच्या पदांचे निकष

काय असावे याबाबत चर्चा करुन कार्यकारी समितीकडे तो प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविला. कार्यकारी समितीने जाहीरात देण्यापूर्वी ॲकॅडमीक कौन्सिलच्या ठरावास मान्यता दिलेली आहे. या प्रकरणाचा सखोल अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, ॲकॅडमीक कौन्सिल समोर पदांचे निकष ठरविण्यासाठी प्रस्ताव का ठेवण्यात आला याची कारणमिमांसा दिलेली नाही. तसेच कार्यकारी समितीने जरी हा प्रस्ताव मान्य केला तरी पण जो पर्यन्त मा.राज्यपाल व कुलपती यास मान्यता देत नाही तो पर्यन्त त्याची अंमलबजावणी विद्यापीठाना करणे अनुचित आहे. प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठाकडे याबाबत कार्योत्तर मान्यता किंवा मा. कुलपती व राज्यपाल यांचेकडे प्रस्ताव पाठविलेबाबत कोणतीच माहिती नाही. विद्यापीठ परिनियम ४१ ते ७० या मध्ये त्या पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता विद्यापीठातील विविध पदांसाठी विहित केलेली आहेत. महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ चे कलम ३३ (क) नुसार सुधारणा करता येते व कलम ३४ प्रमाणे उप कलम १ अनुसार ३ महिन्याचे आत मा.कुलपती यांचे मान्यतेस सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठाने ही कायदेशीर पध्दत न अवलंबिता जाहिरात देवून पदे भरलेली आहेत. ३४ कलमांचे उपकलम ५ अनुसार कुलपती सम्मती देईपर्यन्त कोणताही परिनियम वैध असणार नाही किंवा तो अंमलात येणार नाही असे म्हंटलेले आहे. त्यामुळे विद्यापीठाने पदांची भरती करत असतांना शैक्षणिक पात्रतेची व्याख्या बदलून व त्याबाबत कुलपतींची मान्यता न घेता पदे भरणे हे एक प्रकारची अनियमितता आहे. ही सर्व पदे तांत्रिक असल्यामुळे ती समकक्ष आहेत का किंवा जो फेरबदल केला तो नवीन तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी केला आहे का याबाबत काहीच स्पष्टीकरण विद्यापीठाच्या ठरावावरुन दिसून येत नाही. त्यामुळे डोळयासमोर उमेदवार ठेवून त्याप्रमाणे शैक्षणिक पात्रतेची अट तयार केली. या तक्रारकर्त्यांच्या म्हणण्यास निश्चितपणे तथ्य आढळून येते.

आहे त्या स्वरुपात जाहिरातीचा विचार केल्यास व निवड समितीचा निर्णय योग्य आहे असे ठरविल्यास त्यांनी नियमाप्रमाणे मुलाखत घेवून उमेदवारांना निवड करण्याच्या दृष्टीने निकष ठरवून गुणप्रदान केलेले आहे. त्यामध्ये सर्व तज्ञ व्यक्तींचा समावेश होता व त्यांनी गुणवत्तेप्रमाणे ज्यांने प्रत्यक्ष मुलाखतीत जास्त अंक प्राप्त केले त्याची निवड केलेली आहे. परंतु याबाबत पूर्व परिच्छेदात नमूद केलेल्या बाबींचा विचार व्हावा.

तक्रारदार यांनी नमूद केलेल्या यादीतील डॉ. बी.डी. मेश्राम यांना मुलाखतीत बोलाविलेले नव्हते. कारण त्यांनी अनुभवाबाबत आनंद डेअरी गुजराथ यांचे जे प्रमाणपत्र सादर केले होते त्याची सत्यता पडताळणी विद्यापीठाने केली असता आनंद डेअरी यांनी सदर प्रमाणपत्र त्यांनी दिलेले नाही असे विद्यापीठास कळविले. म्हणून त्यांना मुलाखतीस बोलाविलेले नव्हते.

डॉ. वाय. डी. देशमुख डेरी टेक्नॉलॉजीसाठी अर्जदार होते. परंतु, प्राथमिक तपासणीत ते निकष पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांना मुलाखतीस बोलाविले नव्हते.

डॉ. व्ही.डी. अहेर हे व्हेटर्नरी सर्जरी व रेडिऑलॉजी यासाठी अर्जदार होते. परंतु, प्रत्यक्ष मुलाखतीत डॉ. पी. टी. जाधव यांनी जास्त अंक मिळाल्यामुळे निवड समितीने त्यांना निवडलेले आहे.

डॉ. पातुरकर हे बायो टेक्नॉलॉजी या विषयासाठी अर्जदार होते. परंतु निवड समितीने डॉ. वनालीकर यांची निवड केल्यामुळे डॉ.पातुरकर यांची निवड झालेली नाही.

डॉ. कारेमोरे हे व्हेटर्नरी ॲनॉटॉमी या विषयातील पदासाठी अर्जदार होते. परंतु, निवड समितीने श्री.चरंजन यांची निवड केलेली आहे.

डॉ.लाडूकर हे व्हेटर्नरी हिस्ट्रॉलॉजी व ॲनॉटॉमी या विषयासाठी अर्जदार होते. परंतु, तज्ञ समितीने डॉ. बानू बाकोडे यांची निवड केलेली आहे.

डॉ. आमले हे ॲनीमल गायनॉकॉलॉजी या विषयासाठी अर्जदार होते. परंतु निवड समितीने डॉ.अजय गावंडे यांची निवड केल्यामुळे डॉ.आमले यांना नेमणूक दिलेली नाही.

असोसिएट डीन व्हेटर्नरी सायन्स या पदासाठी डॉ. भोसले यांची निवड झालेली आहे.या व्यतिरिक्त डॉ. काळबांडे व डॉ. टाकरखेडे यांची पण निवड करण्यांत आलेली आहे. त्या पदासाठी डॉ.एस.व्ही. देशमुख, डॉ. सरकटे, डॉ. धांडे, डॉ.पंचभाई, हे निवड समितीने नाकारल्यामुळे नेमणूकीस पात्र ठरलेले नाहीत.

डॉ.वाय.डी. देशमुख यांनी डेरी टेक्नॉलॉजीसाठी अर्ज केला होता, परंतु छाननीमध्ये पदासाठी असलेले निकष हे पूर्ण करीत नसल्यामुळे त्यांना मुलाखतीस बोलाविले नव्हते व त्या ऐवजी डॉ. चांगदे यांची निवड करण्यांत आलेली आहे.

प्रत्यक्ष मुलाखतीमध्ये निवड झालेल्या उमेदवाराने प्राप्त केलेले गुण व तक्रारदार यांनी नमूद केलेल्या उमेदवाराने प्राप्त केलेले गुण सोबत परिशिष्ठात नमूद केले आहे. या व्यतिरिक्त

विद्यापीठाने अशीही माहिती दिली की, या सर्व पदाच्या मुलाखतींचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे.

**तक्रार क्रमांक २):** प्रत्यक्ष मुलाखतीमध्ये १०० गुण ठेवलेले असतात. त्यापैकी ६० गुण पुर्वानुभव यासाठी आणि उर्वरित ४० गुण प्रत्यक्ष मुलाखतीसाठी विद्यापीठाचे परिनियम ६० प्रमाणे ठेवण्यात आले आहे. तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, हे प्रमाण ८०:२० असे असायला हवे होते. परंतु, परिनियमाचा विचार करता, त्यात तथ्य दिसून येत नाही.

विद्यापीठामध्ये शासनाचे आरक्षण धोरण राबविले जात नाही असे तक्रारदाराचे म्हणणे आहे.विद्यापीठामध्ये बिंदु नामावली प्रमाणे प्रत्येक पदाचे रजिस्टर तयार करण्यात आलेले आहे. मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाने या बिंदु नामावलीची तपासणी करुन ते नियमाप्रमाणे आहे. परंतु विविध पदांची पदभरतीची जाहीरात देतांना सदर बिंदु नामावली प्रमाणित नव्हती. आता प्रमाणित केलेली बिंदु नामावली आणि जाहिरातीत नमूद केलेली पदे यांचा तुलनात्मक अभ्यास करता आरक्षण धोरणाचे उल्लंघन झालेले दिसून येत नाही.

- निवड करण्यासाठी तज्ञ व इतर सदस्य यांना त्यांच्या गरजांप्रमाणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता दिलेला आहे. त्यामुळे नियमाचे उल्लंघन झालेले दिसून येत नाही.

जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील पदांची पात्रता ही अधिनियमातील तरतूदींना धरुन नाही ही बाब सत्य आहे. परंतु, त्यासाठी ॲकॅडमीक कौन्सिल आणि त्यानंतर कार्यकारी समिती यांनी या फेरबदलास मान्यता दिलेली आहे. विद्यापीठ अधिनियम ३४ प्रमाणे मा.कुलपतींची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच ॲकॅडमीक कॉन्सिल यांनी फेरबदल केल्यानंतर त्यास मा.कुलपतींची मान्यता घेतलेली नाही. तसेच, निवड झालेले उमेदवार कोणाचे नातेवाईक आहेत किंवा पूर्वी कार्यरत असलेल्या अधिका-यांचे नातेवाईक आहेत किंवा कसे ही बाब तपासणे शक्य नाही. विद्यापीठातील काही प्राध्यापकांनी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड येथून पी.एच.डी. ही पदवी प्राप्त केलेली आहे. सदर विद्यापीठ विधीवत स्थापन झालेले आहे. परंतु, सदर विद्यापीठात दुग्ध व्यवसाय हा विषय असू शकत नाही. तसेच सदर पी.एच.डी. पदवी प्राप्त करण्यासाठी संबंधितांनी पशु विज्ञान विद्यापीठांची पूर्व परवानगी घेतलेली नाही म्हणून मुंबई येथील पशु वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ.अब्दुल समद यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केलेली आहे. सदर समिती आपला

अहवाल अजून सादर करु शकलेली नाही. सदर अहवाल आल्यानंतर या प्रकरणाचे पुर्नविलोकन व्हावे.

तक्रारदारांनी असे नमूद केले आहे की, लिपिक व वरिष्ठ लिपिक यांचे पदासाठी भरती होत असतांना टंकलेखन अनिवार्य केलेले नव्हते. परंतु, नंतर त्याची परिक्षा पण घेतली. जाहीरातीमध्ये टंकलेखन आवश्यक आहे असे नमूद केलेले नव्हते. त्यामुळे सदर पदाची भरती करीत असतांना टंकलेखनातील पात्रता विचारात न घेता मुलाखती घेतलेल्या आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस उमेदवारांमध्ये निश्चितपणे गोंधळ झालेला आहे. विद्यापीठाने जेंव्हा क वर्गातील पदे भरली जातात त्या वेळेस सर्व बाबींचा विचार करुनच जाहीरात द्यायला हवी ज्यामुळे उमेदवारातील गैरसमज व गोंधळ टाळला जावू शकला असता. परंतु ही सतर्कता विद्यापीठाने दाखविलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या तक्रारीस वाव मिळालेला आहे.

तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, कक्ष अधिकारी या पदावर निवड केलेले उमेदवार लिपिक व वरिष्ठ लिपिक या पदासाठी देखील अर्ज केलेले उमेदवार आहेत. त्यांची निवड कक्ष अधिकारी म्हणून झालेली आहे. प्रत्येक व्यक्तीस नोकरी शोधत असताना ज्येष्ठ व कनिष्ठ अशा दोन्ही पदावर पात्रता असल्यास अर्ज करता येतो. त्याला विद्यापीठ पायबंद घालू शकत नाही. त्यामुळे या तक्रारीत तथ्य नाही.

तक्रारदार यांचे असे म्हणणे आहे की, महिला कर्मचारी विशेषतः अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय यांच्या बदल्या करुन त्यांचे विरुध्द विभागीय चौकशा सुरु केलेल्या आहेत. ही प्रशासकीय बाब असल्यामुळे त्या बाबतीत चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

विद्यापीठामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी नेमून पैशाची उधळपट्टी करण्यात आलेली आहे. याबाबत चौकशी केली असता असे दिसून आले की, शासन नियमाप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या नेमणूका रिक्त पदे भरली जाई पर्यन्त करण्यात आलेल्या होत्या व त्यांना शासन आदेशाप्रमाणेच वेतन देण्यात आलेले आहे. यामध्ये प्रशासकीय सोय म्हणून ही बाब केलेली आहे. आता सर्व सेवानिवृत्त कर्मचारी कार्यमुक्त करण्यात आले आहेत.

विद्यापीठामध्ये वाहने व मोबाईल यांची खरेदी शासनाची मान्यता घेवून विद्यापीठात ठराव करुन आणि शासनाने ठरविलेल्या खर्चाच्या मर्यादेमध्ये या बाबी करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या अनियमितता दिसून येत नाही

विद्यापीठाने निम्नस्तर शिक्षणासाठी सुमारे १५० संस्थांना निकष डावलून किंवा ते शिथील करुन मान्यता दिलेली आहे असे म्हंटलेले आहे. या बाबत विद्यापीठामध्ये अॅकॅडमीक कौन्सिल सक्षम आहे. सर्व बाबी तपासून मान्यता दिली जाते. दुसरा आरोप असा आहे की, मंजूर क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी या शाळांमधून प्रवेश घेतात आणि समाज कल्याण विभागातर्फे शिष्यवृत्तीच्या रुपाने शासनाचा पैशाचा अपव्यय होतो. परंतु विद्यापीठात चौकशी केली असता असे आढळून आले की, या बाबत नियमाप्रमाणे मान्यता देवून शाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. तसेच ग्रामीण स्तरावर तांत्रिक ज्ञान असलेले उमेदवार उपलब्ध व्हावे या दृष्टीने शिक्षण विस्तार हे धोरण ठेवून या शाळा देण्यात आलेल्या आहेत.

अर्जदाराच्या तक्रारीप्रमाणे सर्व मुद्यांवर सखोल चौकशी करुन वरील प्रमाणे बाबी निष्पन्न झालेल्या आहेत. फक्त (अॅकॅडमीक कौन्सिल कार्यकारी समिती यांनी शैक्षणिक पदांच्या भरतीसाठी विद्यापीठ परिनियमाप्रमाणे मा. कुलपतींची मान्यता न घेता पद भरले ही बाब अनियमित आहे. तसेच शैक्षणिक अर्हता जाहीरात आल्यानंतर उमेदवार उपलब्ध होत नाही असे आढळून आल्यास फेरबदल केला असता तर समर्थनीय ठरले असते. परंतु, अधिनियमातील व परिनियमातील तरतूदींना छेद देवून तत्पूर्वी असा फेरबदल करणे समर्थनीय वाटत नाही. ) Imp.

**तक्रार क्रमांक ३ :** श्री. भैय्यासाहेब शेलारे जनरल सेक्रेटरी अनुसूचीत जाती महासंघ यांनी तक्रार दिलेली आहे. त्यांच्या तक्रारीमध्ये एकूण १६ मुद्दे आहेत. या सर्व १६ मुद्यांचे विश्लेषण वर तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर दिलेले आहे. तेच मुद्दे त्यांनी परत मांडलेले आहेत. म्हणून याबाबत वरीलच अहवाल या तक्रारीच्या संदर्भात ग्राह्य समजण्यात यावा.

यामध्ये फक्त डॉ. बी.डी. मेश्राम यांचा उल्लेख त्यांनी केलेला आहे त्यांनी सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र वैध नव्हते. म्हणून त्यांना निवडण्यात आलेले नाही. दुसरा मुद्दा त्यांनी विविध उमेदवार मा. उच्च न्यायालयात गेलेले आहेत असे म्हंटलेले आहे. याबाबत विद्यापीठाकडून कोर्ट प्रकरणांची सविस्तर माहिती घेवून सोबत जोडली आहे. त्यावरुन असे दिसून येते की, कोणतेही प्रकरण अद्यापपर्यन्त विद्यापीठाच्या विरुध्द निकाली निघालेली नाहीत.

**तक्रार क्रमांक ८ :** श्री. भैय्यासाहेब शेलारे , सचिव अखिल भारतीय अनुसूचीत जाती जमाती महासंघ यांनी अशी तक्रार मांडली आहे की, दुग्ध विद्याशाखेत देण्यात आलेल्या स्वामी

रामानंद तिर्थ विद्यापीठ, नांदेड, पदव्या या अनधिकृत आहेत. त्यामुळे या विद्यापीठाच्या पी.एच.डी. मान्य करण्यांत येवू नयेत. तक्रार क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे चौकशी अहवाल येईपर्यन्त या प्रकरणी थांबणे योग्य राहील.

कुमारी एस.एस. देवसरकर यांची मुलाखात झालेली आहे. व प्रतिक्षा यादीवर त्या अनुक्रमांक १ वर होत्या. त्यामुळे त्यांची नेमणूक रीतसर झालेली दिसून येते.

डॉ. बी. डी. मेश्राम यांना अपात्र ठरविले बाबत तक्रार केलेली आहे. त्याबाबत तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तार विवेचन केलेले आहे.

**तक्रार क्रमांक ९ :** श्री. भैय्यासाहेब शेलारे, सचिव अनुसूचीत जाती महासंघ यांनी या तक्रारीत नमूद केलेल्या सर्व बाबींवर तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तार विवेचन केलेले आहे. तेच संदर्भ यातील तक्रारी संबंधी ग्राहय धरण्यात यावा.

**तक्रार क्रमांक १०:** श्री. भैय्यासाहेब शेलारे, सचिव, अनुसूचीत जाती महासंघ यांनी हा तक्रार अर्ज दिलेला आहे. यातील सर्व मुद्यांवर तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर विवेचन केलेले आहे. ते ग्राहय धरण्यात यावे. नवीन मुद्दा नाही.

**तक्रार क्रमांक १८:** एम. एन. चोखांदरे,संघटक (विदर्भ) ऑल इंडिया अनुसूचित जाती-जमाती संघटना,अमरावती शाखा, अर्जदारानी नमूद केलेल्या तक्रारीबाबत तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर विवेचन केलेलेआहे. कोणताही नवीन मुद्दा यामध्ये नाही. त्यामुळे तक्रार क्रमांक २ मध्ये दिलेले विवेचन ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक १९ :** श्री. केशव टाकरे, अध्यक्ष नागपूर शहर (जिल्हा) कॉंग्रेस कमिटी, रा. नागपूर, यांनी कोणतीही विशिष्ठ तक्रार केलेली नाही. पदभरतीमध्ये भ्रष्टाचार झाला असे त्यांनी अर्जात म्हंटलेले आहे. याबाबत चौकशी करणे शक्य नाही. ही बाब लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे चौकशीसाठी देणे योग्य टरेल.

**तक्रार क्रमांक २१** : श्री. बाबुराव तिडके, अध्यक्ष, श्रीराम सहकारी साखर कारखाना मर्या, नागपूर, यांनी अशी तक्रार केली आहे की, निम्नशिक्षण संस्था यांची अवाजवी संख्या वाढविण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो, पण ते शाळेमध्ये हजर नसतात. त्यामुळे शिष्यवृत्तीच्या रुपाने सुमारे ६ ते ७ कोटी रुपये शासनाच्या तिजोरीतून खर्च होतात. याबाबत विद्यापीठात चौकशी केली असता नियमाप्रमाणे हजेरीपट बघूनच शिष्यवृत्ती दिली जाते व विद्यापीठाचा संबंध फक्त

निम्नस्तर शाळांना मान्यता देण्यापूरता मर्यादित आहे. या शाळांचा शैक्षणिक दर्जा योग्य राहील याबाबत विद्यापीठ काळजी घेत असते. त्यामुळे या तक्रारीत तथ्य नाही.

तक्रार क्रमांक २ प्रमाणे ज्या बाबी मांडलेल्या आहेत त्या बाबत तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर विवेचन केलेले आहे. ते या ठिकाणी ग्राहय धरण्यात यावे.

तक्रार क्रमांक ३ प्रमाणे सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या नेमणूका विद्यापीठांनी केल्या होत्या ही बाब खरी आहे. परंतु, या नेमणूका करीत असतांना शासनाचे मार्गदर्शक तत्व असे नेमणूकीचा कालावधी, द्यावयाचे वेतन या बाबी पाळूनच नेमणूका केल्या होत्या. हे कागदपत्र तपासल्यानंतर स्पष्टपणे दिसून आलेले आहे. आता अशा कर्मचा-यांच्या नेमणूका संपुष्टात आणण्यात आलेले आहे.

तक्रार क्रमांक ४,५,६, ७ या बाबत तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर विवेचन केलेले आहे. ते या ठिकाणी ग्राहय धरण्यात यावे.

तक्रार क्रमांक ८ प्रमाणे डॉ. एस. व्ही. देशमुख यांनी कार्यकारी समितीची बैठक चालू असतांना त्या ठिकाणी येवून बेशिस्त वर्तन केले व त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस वगैरे दिल्यानंतर त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला अशी माहिती विद्यापीठातर्फे देण्यात आली.

तक्रार क्रमांक ९,१०,१२,१३,१४ याबाबत तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर विवेचन केलेले आहे. ते ग्राहय धरण्यात यावे. तक्रार क्रमांक १५ नुसार विद्यापीठातर्फे संशोधन व विस्तार याबाबत कार्यवाही होत नाही असे म्हंटलेले आहे. त्याबाबत विद्यापीठात होत असलेल्या विविध प्रकल्पाबाबत प्रशिक्षणाबाबत सविस्तर माहिती परिशिष्टात जोडली आहे.

तक्रारदारानी असे म्हंटले आहे की, विद्यापीठामध्ये क्षमतेप्रमाणे विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत, कारण त्यांचा विद्यापीठातील शैक्षणिक दर्जाबाबत विश्वास राहिलेला नाही. याबाबत मागील ३ वर्षातील एकूण प्रवेश क्षमता व प्रत्यक्ष प्रवेश घेतलेले विद्यार्थी याची माहिती परिशिष्ठ ८ मध्ये जोडलेली आहे. यावरुन क्षमतेपेक्षा कमी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला ही बाब सिध्द होते. याबाबत कुलगुरुंशी चर्चा केली असता त्यांनी व्यावसायिक शिक्षणात विविध पर्याय उपलब्ध असल्यामुळे व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरीची शाश्वती असल्यामुळे पशुविज्ञान शाखेकडे न येता इतर शाखेकडे जाण्याचा विद्यार्थ्यांचा कल दिसून येतो. शिवाय सी.ई.टी. परिक्षा उत्तीर्ण होणे, गुणवत्ता यादीमध्ये येणे, असे निकष असल्यामुळे प्रवेश क्षमतेवर विपरीत परिणाम होवू शकतो असे त्यांनी स्पष्ट केले. ही बाब पटण्यासारखी आहे त्याचा विचार व्हावा.

<u>तक्रार क्रमांक २३</u>: आमदार अमर काळे यांनी सदर तक्रार दिली आहे. या तक्रारीत नमूद केलेले सर्व मुद्दे तक्रार क्रमांक २ मध्ये आलेले आहेत त्याचे सविस्तर विवेचन त्यामध्ये केलेले आहे. ते या ठिकाणी ग्राहय धरण्यात यावे. एकही नवीन मुद्दा त्यांनी मांडलेले नाही.

<u>तक्रार क्रमांक २४</u>: डॉ. एस.के. नायर राहणार नागपूर यांनी सदर तक्रार दिलेली आहे. त्यांनी श्री. डी.एन. बाजड यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने पी.एच्.डी पदवी दिल्याबाबत तक्रार केलेली आहे. याबाबत त्यांनी वरिष्ठांची परवानगी घेतलेली नव्हती असे म्हंटलेले आहे. याबाबत डॉ. अब्दूल समद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर या प्रकरणाचे पुनर्विलोकन व्हावे.

<u>तक्रार क्रमांक २६:</u> डॉ. एस. के. नायर यांनी विद्यापीठातील प्राध्यापक संवर्गातील पदभरतीबाबत तक्रार दिलेली आहे. याबाबत तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर निवेदन केलेले आहे. ते येथे ग्राहय धरण्यात यावे.

<u>तक्रार क्रमांक २८</u> : डॉ. एस. के. नायर यांनी श्री.एम.आर.पाटील यांची सहयोगी प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्याबद्दल व त्यांनी प्राप्त केलेल्या पी.एच.डी. पदवीबाबत तक्रार दिलेली आहे. याबाबत विद्यापीठाने डॉ. अब्दूल समद यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमलेली आहे त्या अहवालाची प्रतिक्षा आहे. तोपर्यन्त हे प्रकरण प्रतिक्षाधीन ठेवावे.

<u>तक्रार क्रमांक ३८:</u> आमदार देवेंद्र फडणवीस यांनी ही तक्रार दिलेली आहे. या तक्रारीसोबत त्यांनी श्री. भैयासाहेब शेलारे यांचे निवेदन मांडलेले आहे. याबाबत तक्रार क्रमांक २ मध्य सविस्तर विवेचन केलेले आहे ते येथे ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ३९ :** आमदार देवेंद्र फडणवीस यांनी सदर तक्रार दिलेली असून पदभरती प्रक्रियेस स्थगिती द्यावी असे म्हंटलेले आहे.

<u>तक्रार क्रमांक ४० :</u> आमदार देवेंद्र फडणवीस यांनी ही तक्रार दिलेली आहे. त्यांनी असे निवेदन दिलेले आहे की, स्वतंत्र अधिकाऱ्यांमार्फत कुलगुरुंची चौकशी करण्यात यावी. त्यासाठी कुलगुरुंना सक्तीचे रजेवर पाठवावे.

<u>**तक्रार क्रमांक ४१ :**</u> आमदार गुलाबराव गावंडे यांनी ही तक्रार दिलेली आहे. त्यांनी नमूद केलेल्या तक्रारीबाबत तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर निवेदन केले आहे. ते येथे ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ७४**: आमदार सुधाकर गणगणे यांचे सदर पत्र असून त्यांनी विद्यापीठाचे काम व्यवस्थित चाललेले आहे याची शासनाने नोंद घ्यावी व दखल घ्यावी.

**तक्रार क्रमांक ८२** : डॉ.व्ही. डी. अहेर यांचा सदर तक्रार अर्ज असून त्यांनी असे नमूद केले आहे की, अर्जाची छाननी करीत असतांना केलेल्या कामाचे मूल्यमापन त्यांना ४८.७६ इतके अंक मिळालेले आहे. परंतु डॉ. पी.टी. जाधव यांना केवळ २१ गुण मिळालेले असतांना त्यांची निवड प्राध्यापक (सर्जरी व रेडिऑलॉजी) या पदासाठी नामनिर्देशनाद्वारे करण्यात आलेली आहे. याबाबत विद्यापीठाचे असे म्हणणे आहे की, छाननी पत्रातील मूल्यांकन आणि प्रत्यक्ष मुलाखतीत मिळालेले गुण याचा विचार करता डॉ. पी.टी. जाधव यांची निवड समितीने केलेली आहे. डॉ. अहेर यांनी डॉ. जाधव यांनी प्राप्त केलेल्या पी.एच.डी पदवी बाबत देखील प्रश्न उपस्थित केलेला आहे. परंतु, डॉ.अब्दुल समद यांचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर या प्रकरणाचे पुनर्विलोकन व्हावे.

**तक्रार क्रमांक ८३**: श्री. वसंत सुगावे पाटील यांची ही तक्रार आहे. त्यांनी शासनाच्या कुलगुरुंची चौकशी करण्याबाबतच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. परंतु, त्यांचे अधिकार गोठवून त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे असे म्हटलेले आहे ज्याची आता आवश्यकता नाही.

**तक्रार क्रमांक ८४:** सौ. माया इवनाते, महापौर नागपूर, यांनी सदर तक्रार अर्ज दिलेला आहे. त्यांनी त्यांच्या निवेदनात बिंदु नामावलीचे पालन न करणे, संशोधन विशेषतः विदर्भ विभागात केलेले नाही असे म्हंटलेले आहे. कार्यकारी समितीवर विधानमंडळ सदस्यातून लवकर नेमणूक करावी असे त्यांनी म्हंटले आहे. कुलगुरु यांची प्रशासनावर पकड नाही असेही त्यांनी म्हंटले आहे. याबाबत तक्रार क्रमांक २१ मध्ये सविस्तर विवेचन केलेले आहे तेच अभिप्राय या ठिकाणी ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ११०**: श्री. प्रतिक नवले व इतर यांनी सदर तक्रार अर्ज दिलेला आहे. सदर अर्जात त्यांनी दुग्ध विभागातील प्राध्यापकांच्या नेमणूकीबाबत त्यांची तक्रार दिलेली आहे. याबाबत सविस्तर विवेचन तक्रार क्रमांक २ मध्ये केलेले आहे. तेच अभिप्राय या तक्रारीसंदर्भात ग्राहय धरण्यात यावेत.

वरील अहवाल तयार करीत असतांना सचिव (पदुम) यांनी अशा सूचना दिल्या की, या प्रकरणी डॉ. सुरेंद्र रावरकर व इतर प्रमुख तक्रार करणारे तसेच पशुविज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु व

**तक्रार क्रमांक ४२ :** श्रीमती सुलेखा कुंभारे यांनी ही तक्रार दिलेली आहे. याबाबत तक्रार क्रमांक २ बाबत सविस्तर विवेचन दिलेले आहे ते येथे ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ४३ :** आमदार राजेंद्र पाटवी यांनी ही तक्रार दिलेली आहे. त्यांनी फक्त मोवममध्ये पदभरतीमध्ये नियमबाहय नियुक्त्या केल्या असे म्हंटले आहे. विशिष्ठ प्रकरण सादर केलेले नाही. त्यामुळे अभिप्राय नाहीत.

**तक्रार क्रमांक ४४:** आमदार डॉ. नितीन राऊत यांनी ही तक्रार दिलेली आहे. त्यांनी नमूद केलेल्या मुद्यांवर तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर विवेचन आलेले आहे. ते ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ४५** : आमदार डॉ. नितीन राऊत यांनी सदर तक्रार दिलेली आहे. यातील मुद्यांवर तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर विवेचन आलेले आहे. ते ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ४६** : श्री. अनिल देशमुख आमदार व मंत्री यांनी सदर तक्रार दिलेली आहे. याबाबत सविस्तर विवेचन तक्रार क्रमांक २ मध्ये आलेले आहे. ते ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ५८** : आमदार हरिदास भदे यांनी सदर तक्रार दिलेली आहे. याबाबत त्यांनी असे म्हंटले आहे की, मागासवर्गीयांच्याबाबत पदभरतीमध्ये विचार न करता मागासवर्गीय उमेदवारांना डावलून पदे भरलेली आहेत. याबाबत तक्रार क्रमांक २ मध्ये विवेचन केलेले आहे ते ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ५९:** आमदार हरिदास भदे यांनी सदर तक्रार दिलेली आहे. त्यांनी कुलगुरु व कुलसचिव यांना सक्तीचे रजेवर पाठवावे असे म्हंटलेले आहे.

**तक्रार क्रमांक ६४:** आमदार श्री.सुधार मुनगंटीवार यांची ही तक्रार आहे. यात नमूद केलेल्या मुद्यांवर तक्रार क्रमांक २ मध्ये सविस्तर विवेचन आलेले आहे. ते ग्राहय धरण्यात यावे.

**तक्रार क्रमांक ६८:** श्री.देवेंद्र अर्जुनसिंह बनाफर याची ही तक्रार आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, प्रत्यक्ष मुलाखतीमध्ये त्याला जास्त गुण मिळून देखील नेमणूक देण्यात आलेली नाही. याबाबत त्याला असलेला अनुभव विद्यापीठाने ग्राहय न धरल्याने त्यास नेमणूक देण्यात आलेली नाही.

**तक्रार क्रमांक ७० :** श्री.एस.के.पाटील प्राध्यापक यांचे नेमणूकीबाबत सदर तक्रार आहे. यामध्ये जाहीरात देण्याबाबत मुद्दयाबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. परंतु विद्यापीठाने मंजूर ठरावाप्रमाणे जाहीरात दिलेली आहे व त्याबाबत सदरें ठराव ग्राहय धरावा किंवा कसे याबाबत तक्रार २ मध्ये विवेचन केलेले आहे.

कुलसचिव यांचेबरोबर तक्रारी संदर्भात चर्चा करुन त्यांचे म्हणणे समक्ष ऐकून घेवून अहवालास अंतिम स्वरुप द्यावे. त्या दृष्टीने ४/१/२०१० रोजी तक्रार करणा-यांना दिनांक १२/१/२०१० रोजी कुलगुरु व कुलसचिव यांना समक्ष बोलावून चर्चा करुन त्यांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे.

२. तक्रारदार डॉ. सुरेंद्र सावरकर हे पूर्वी पशुविज्ञान विद्यापीठात नोकरीला होते, पण आता त्यांची सेवा बडतर्फ केल्यामुळे संपुष्टात आलेली आहे. त्यांनी वेगवेगळी तीन निवेदने व किरकोळ अर्ज विद्यापीठातील पदभरती संदर्भात सादर केलेले आहे. त्यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेल्या प्राध्यापकवर्गीय पदांबाबत त्यांचेशी समक्ष चर्चा केली. तक्रार क्रमांक २ मध्ये प्राध्यापकवर्गीय भरतीसंदर्भात चौकशीअंती समोर आलेली माहिती व त्यावरील माझे निष्कर्श प्राध्यापकनिहाय पदांबाबत नमूद केलेले आहे. म्हणजे ॲकॅडमीक कॉन्सिलचा ठराव कार्यकारी समितीची त्यास मान्यता व त्याप्रमाणे जाहीरात देणे असा घटनाक्रम आहे. तसेच परिनियमातील तरतुदीनुसार मा.कुलपती यांची मान्यता न घेता विद्यापीठाने जाहीरात दिलेली आहे त्याप्रमाणे मुलाखती घेवून उमेदवारांची निवड करुन नेमणूक पत्र देण्यात आलेले आहे. या संदर्भात तक्रार क्रमांक २ च्या विवेचनात नमूद केल्याप्रमाणे मा.कुलपती यांची मान्यता न घेता ज्या नेमणूका केलेल्या आहेत त्याबाबत निर्णय व्हावा. तसेच परिनियमात नमूद केलेली अर्हता त्यामध्ये केलेला बदल याचाही विचार होणे जरुरी आहे. तक्रारदारांचे असे म्हणणे आहे की, काही विषय विशेषत: दुग्ध तंत्रज्ञानाबाबत देशात कोणत्याही विद्यापीठात शिकविले जात नाही त्याबाबत त्यांनी उदाहरण म्हणून दुग्धविषयक अर्थशास्त्र या विषयाचा उल्लेख केला आणि त्यासाठी पात्रता नसलेल्या उमेदवारांची नेमणूक केली असे त्यांनी सांगितले. सुक्ष्म जीवशास्त्र या विषयाचे पदव्युत्तर उमेदवार श्री.दिनकर वाजड यांची नेमणूक रसायनशास्त्र या विषयासाठी केलेली आहे. अशीच विसंगत नेमणूक श्री.श्रीकांत कल्याणकर व श्री. आनंद सरोदे आणि श्री.अभय कॅंमेरकर यांच्यात झालेल्या आहेत असे त्यांच्या तक्रारीत नमूद केले. श्री. कामाजी डाकोरे यांना शैक्षणिक अनुभव नसतांना नेमणूक दिलेली आहे. श्री. वसंतराव शेंडे यांना पी.एच.डी. नसतांना दुग्धविषयक अर्थशास्त्र या पदावर नेमणूक दिलेली आहे. श्री. गजेंद्र लोंढे यांना शैक्षणिक अनुभव नसतांना दुग्ध तंत्रज्ञान या विषयासाठी नेमणूक दिलेली आहे. श्री. माधव पाटील यांनी रसायन विभागात पी.एच्.डी पदवी घेतलेली नसतांना त्यांना नेमणूक दिलेली आहे. श्री. एस्.एस.फंड हे अपंग असतांना त्यांना पशुविज्ञान शिक्षण व विस्तार या पदासाठी नेमणूक दिलेली नाही.

क व ड वर्गातील पदे भरत असतांना जाहीरातीत नमूद केलेले निकष लक्षात न घेता नेमणूका केलेल्या आहेत. या संदर्भात त्यांनी श्री. युसुफ इसमार यांची वाहक व तंत्रज्ञ या पदासाठी श्री. गोडवेल यांची तंत्रज्ञ पदांसाठी मंगेश राऊत यांची वाहक पदासाठी अशा काही पदांचा त्यांनी उल्लेख केला. त्यांनी असा मुद्दा मांडला की, कार्यालयीन तपासणी पथकाने शिफारस न केलेल्या उमेदवारांना केवळ त्यांची निवड करावयाची आहे म्हणून शिफारस करण्यात येवून मुलाखतीस बोलावून त्यांची निवड करण्यात आलेली आहे. अशा कनिष्ठ पदासाठी अर्ज करणारे उमेदवार न्यायालयीन प्रकरणे करु शकत नाहीत परंतु, आपल्या मर्जीतील उमेदवार घेण्यासाठी विद्यापीठाने सर्व निकष बाजूला ठेवून मुलाखतींचा फक्त देखावा केला आहे. आपल्या म्हणण्याचे पुष्ठयर्थ त्यांनी सर्व कागदपत्रे सादर केलेली आहेत.

दुसरे तक्रारदार श्री.भैयासाहेब शेलारे यांनी त्यांचे दोन सहकाऱ्यांसह समक्ष भेटीमध्ये त्यांचे निवेदन कथन केले. यापूर्वी त्यांनी लेखी निवेदने सादर केलेली आहेत व त्याचा ऊहापोह सविस्तर अहवालामध्ये तक्रार क्रमांक २च्या विश्लेषणात केलेला आहे. त्यांचा मुद्दा असा आहे की, आरक्षणाचे धोरण डावलून त्यांनी पदभरती केलेली आहे. याबाबत आरक्षणाचे बिंदुनामावली तपासलेली आहे. तसेच शासन स्तरावर साप्रवि.ने ती बरोबर असल्याबाबत प्रमाणित पण केलेली आहे. या बिंदुनामावलीप्रमाणे पदभरती करण्यात आलेली आहे. फक्त जाहीरात देताना बिंदुनामावली तयार नव्हती व शासन स्तरावरुन प्रमाणित झालेली नव्हती. ही केवळ तांत्रिक बाब आहे. परंतु, पदभरतीमध्ये आरक्षणाचे धोरण डावललेले सकृतदर्शनी दिसून येत नाही. श्री.शेलारे यांनी कुलगुरु यांचेवर फौजदारी कार्यवाही शासनाने करावी किंवा त्यांना फौजदारी दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी असे समक्ष निवेदनात त्यांनी सांगितले. प्रथमदर्शनी आरक्षणाचे धोरण डावललेले दिसून येत नाही. त्यामुळे फौजदारी कार्यवाहीची आवश्यकता नाही असे वाटते.

श्रीमती चित्रा अनवाणे यांनी लेखा अधिकारी या पदासाठी अर्ज केलेला होता. त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त करुन घेतलेल्या कागदपत्रात असे दिसून येते की, निवड समितीने त्यांची निवड केलेली आहे. परंतु, त्यांनी दाखल केलेला अनुभवाचा दाखला हा शिक्षक सहकारी बँकेचा असल्यामुळे तो ग्राहय धरण्यात आलेला नाही. श्रीमती अनवाणे यांनी दाखल केलेल्या बँकेच्या परिपत्रकावरुन असे दिसून येते की, शेडयूल्ड बँक म्हणून सहकारी बँकेला मान्यता दिलेली आहे. यात निवड न झाल्याबद्दल श्रीमती अनवाणे यांनी विद्यापीठाच्या तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज

सादर केला होता. त्यानंतर प्रकरण तपासून त्या वयाने जास्त आहेत म्हणून नेमणूक दिली नाही असा निष्कर्ष सदर कक्षाने काढलेला आहे. या प्रकरणात असे दिसून येते की, विद्यापीठाने निवड प्रक्रिया करण्यापूर्वी अर्जांची छाननी निट केलेली नाही. त्यामुळे अशा तक्रारींना वाव मिळतो. याबाबत विद्यापीठ गंभीरतेने अशी प्रकरणे हाताळावी अशी अपेक्षा आहे.

श्री.सचिन हेडावू यांची लेखापाल म्हणून नेमणूक केलेली आहे. या पदासाठी पूर्वानुभव आवश्यक होता. श्री. हेडावू यांनी कुक्कुट पालन सहकारी संस्थेचे पूर्वानुभव पत्र सादर केलेले आहे, जे संशयास्पद आहे असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. याबाबत विद्यापीठाकडे चौकशी केली असता जे प्रमाणपत्र दाखल केले ते ग्राह्य धरले आहे असे त्यांनी सांगितले. वास्तविक अशा पत्रांची शहानिशा करणे आवश्यक आहे. कारण एका बाजूला श्रीमती अनवाणे यांचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जात नाही तर दुस-या बाजूला श्री.हेडावू यांचे प्रमाणपत्र शहानिशा न करता ग्राह्य धरले जाते, त्यामुळे संशयास जागा उरते.

दिनांक १२/१/२०१० रोजी विद्यापीठाचे कुलगुरु व कुलसचिव यांचे म्हणणे ऐकून घेतले. परिनियमातील ठरवून दिलेल्या शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल कसा केला जातो याबद्दल त्यांचेकडे विचारणा केली. त्यांनी असे सांगितले की, विभागप्रमुख प्रस्ताव तयार करतात त्यासाठीचे डीन अध्यक्ष असतात. त्यांचा प्रस्ताव ॲकॅडमीक कॉन्सिलसमोर सादर केला जातो. कुलसचिव हे सदस्य सचिव म्हणून काम करतात. ॲकॅडमीक कॉन्सीलने प्रस्ताव मान्य केल्यानंतर तो विद्यापीठाच्या कार्यकारी समितीकडे सादर केला जातो. विद्यापीठातील कुलसचिव हे प्रभारी आहेत. या पदावर स्वतंत्र व्यक्तीची नेमणूक झालेली नाही. कारण ३० जानेवारी २००९ रोजी मा.कुलपती यांनी या पदभरतीसाठी स्थगिती आदेश दिलेला आहे. विद्यापीठातील प्रशासन विविध बैठका आणि सर्व कर्मचा-यांवर देखरेख ठेवणे आणि समन्वय साधणे अशा महत्त्वाच्या भूमिका कुलसचिवांना पार पाडाव्या लागतात. अशा परिस्थितीत कुलगुरु यांनी कार्यक्षम व्यक्तींकडे अशा पदाचा पदभार देणे योग्य ठरेल. कारण एकाच व्यक्तीकडे अतिरिक्त पदभार राहणे योग्य वाटत नाही. तरी पर्यायी उमेदवाराची निवड होईपर्यन्त शासन सेवेतील समकक्ष अधिकारी त्या पदावर पाठविणे योग्य ठरेल.

प्राध्यापक पदाच्या भरतीसाठी ३ विभागात भरती केली जाते. पशुविज्ञान विभागासाठी राष्ट्रीय स्तरावर समिती आहे, जे पदाचे निकष निश्चित करतात. दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यासाठी भारतीय कृषि अनुसंधान केंद्र हे निकष ठरवितात. विद्यापीठाने परिनियमात ठरवून दिलेल्या

पात्रतेत कायम बदल केलेला नव्हता, तर केवळ आगामी तीन वर्षासाठी हा बदल केला असे त्यांचे म्हणणे आहे. हा बदल का करावा लागला याचे समर्थनीय कारण विद्यापीठातर्फे देण्यात आलेले नाही. क व ड वर्ग भरतीबाबत समाजकल्याण अधिकारी यांना मुलाखतीसाठी सदस्य म्हणून बोलाविलेले होते. त्यांनी असे निदर्शनास आणले की, शासनातर्फे ऑक्टोबर २००७ मध्ये असे आदेश देण्यात आलेले आहेत की, टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण केलेबाबत प्रमाणपत्र उमेदवाराने सादर केल्यास टंकलेखनाची चाचणी घेण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे प्रत्यक्ष मुलाखतीमध्ये टंकलेखनाची चाचणी घेतली जाणार नाही हे सांगावे लागले व जी पूर्वी चाचणी घेतली होती त्यात मिळविलेले गुण निवडीसाठी विचारात घेतलेले नाही.

—— X ——